जनसंपर्क कक्ष
0 8 AUG 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भारतीय व्यवसाय प्रणाली वैज्ञानिक दृष्टीने अभ्यासणे गरजेचे

## कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के

कोल्हापूर : डॉ. ए. एम. गुरव व डॉ. आर. एस. साळुंखे लिखित भारतीय ज्ञान प्रणाली आणि भारतीय व्यवसाय प्रणाली या पुस्तकाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन झाले.

नवीन शैक्षणिक धोरण २०२० नुसार वाणिज्य व व्यवस्थापन अभ्यासक्रमातील बदलानुसार अभ्यासक्रमात भारतीय ज्ञान प्रणाली आणि भारतीय व्यवसाय प्रणाली अभ्यासण्यासाठी २ क्रेडिटचा कोर्स असून, त्या अनुषंगाने हे पुस्तक वाणिज्य आणि व्यवस्थापन विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञान प्रणालीच्या संकल्पना आणि उपयोजनांचा परिचय करून देते. वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव व कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय पलूस येथील प्राचार्य प्रा. डॉ. आर. एस. साळुंखे यांचे लिखित पुस्तक हे दोन भागात विभागले आहे.

पहिल्या भागात भारतीय व्यवस्थापनाची उत्क्रांती, भारतीय व्यवस्थापनाच्या प्रमुख कल्पना, व्यवस्थापनातील मूल्यांची भूमिका, भारतीय महाकाव्ये आणि व्यवस्थापन, वैदिक व्यवस्थापनाची परिमाणे, भगवद्‌गीता आणि व्यवस्थापन, रामायण आणि व्यवस्थापन, बुद्धाचे व्यवस्थापन, कौटिल्याचे अर्थशास्त्र (चाणक्याचे व्यवस्थापनाचे सिद्धांत) याचे तपशीलवार विवेचन केले आहे, तसेच दुसऱ्या भागात भारतीय व्यवसाय मॉडेल यामध्ये लेखकांनी नामांकित उद्योग समूहाचे उद्योग मॉडेल जसे टाटा, बजाज, आदित्य बिर्ला, रिलायन्स इंडस्ट्रीजचे बिझनेस मॉडेल याचे विश्लेषण केले आहे.

याप्रसंगी प्र. कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्रा. डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. दीपा इंगवले, डॉ. के. व्ही. मारुलकर, तसेच इतर प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी उपस्थित होते. आभार पुस्तकाचे सहलेखक डॉ. आर. एस. साळुंखे यांनी मानले.

0 8 AUG 2024 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील शैक्षणिक दस्तऐवज देण्यासाठी ऑनलाईन पोर्टलची निर्मिती

## कुलगुरू डॉ. शिर्के; नव्या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची होणार सोय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

विद्यार्थी सुविधा केंद्राऐवजी शैक्षणिक दस्तऐवजांची उपलब्धता करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने ऑनलाईन पोर्टलची निर्मिती केली आहे. या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची सोय होणार असल्याचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.

विद्यार्थ्यांना लागणाऱ्या विविध शैक्षणिक दस्तावेजांची उपलब्धता करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने नवीन ऑनलाईन पोर्टलची निर्मिती केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता केवळ तेवढ्यासाठी विद्यार्थी सुविधा केंद्राकडे प्रत्यक्ष भेट देण्याची आवश्यकता उरणार नाही.

विद्यापीठाचे संगणक केंद्र आणि परीक्षा विभागाकडील आयटी कक्ष यांनी संयुक्तपणे काम करून ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. या पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे पदवी प्रमाणपत्र,




तात्पुरते पदवी प्रमाणपत्र, दुबार गुणतक्ता, उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र, रँक प्रमाणपत्र, गुणवत्ता प्रमाणपत्र आणि विशेष प्रमाणपत्र अशी सात प्रकारची कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची ऑनलाईन सुविधा विकसित करण्यात आली आहे. आतापर्यंत या सेवांसाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रास प्रत्यक्ष भेट देऊन त्यासंबंधीचे अर्ज व पैसे भरावे लागत असत. या ऑनलाईन पोर्टलमुळे या सात सेवांसाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठात येण्याची गरज नाही.

या पोर्टलद्वारेच विद्यार्थ्यांना दस्ताऐवजांसाठीचा अर्ज आणि पैसे भरण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. २००५ पासून पुढे उत्तीर्ण असलेल्या विद्यार्थ्यांना त्यांचा पर्मनंट रजिस्ट्रेशन क्रमांक (पी. आर. एन.) आणि उत्तीर्ण झाल्याचे वर्ष या माहितीवर ऑनलाईन लॉगीन करता येऊ शकेल.

सन २००५ पूर्वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मॅन्युअल फॉर्म भरावा लागणार असून तोही येथे उपलब्ध आहे. या मागील विद्यार्थ्यांच्या माहितीचा समावेश करण्याची प्रक्रियाही प्रगतिपथावर आहे.

या प्रणालीचे प्रमुख वैशिष्ट्य असे की, विद्यार्थ्यांना एकाच लॉगिनमधून सर्व दस्तावेजांकरिता अर्ज करण्याची तसेच, त्या सर्वांसाठी एकत्र ऑनलाइन पैसे भरण्याची सुविधा देण्यात आल्याची माहिती संगणक केंद्राचे प्रभारी संचालक अभिजित रेडेकर यांनी दिली.

जनसंपर्क कक्ष

08 AUG 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थी सुविधा केंद्राच्या सुविधा आता 'ऑनलाईन'

## शिवाजी विद्यापीठाच्या संगणक केंद्राची महत्त्वपूर्ण कामगिरी

प्रतिनिधी
कोल्हापूर

विद्यार्थ्यांना लागणाऱ्या विविध शैक्षणिक दस्तावेजांची उपलब्धता करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने नवीन ऑनलाईन पोर्टलची निर्मिती केली. विद्यार्थ्यांना आता केवळ तेवढ्यासाठी विद्यार्थी सुविधा केंद्राकडे प्रत्यक्ष भेट देण्याची आवश्यकता नाही, अशी माहिती संगणक केंद्राचे प्रभारी संचालक अभिजीत रेडेकर यांनी दिली आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या निर्देशानुसार रेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाचे संगणक केंद्र आणि परीक्षा विभागाकडील आयटी कक्ष यांनी संयुक्तपणे काम करून ऑनलाईन प्रणाली विकसित केली. या पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना आवश्यक पदवी प्रमाणपत्र, तात्पुरते पदवी प्रमाणपत्र, दुबार गुणतक्ता, उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र, रँक प्रमाणपत्र, गुणवत्ता प्रमाणपत्र, विशेष प्रमाणपत्र देण्याची ऑनलाईन सुविधा विकसित केली आहे. आतापर्यंत या सेवांसाठी



विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रास प्रत्यक्ष भेट देऊन त्यासंबंधीचे अर्ज व पैसे भरावे लागत असत. या ऑनलाईन पोर्टलमुळे उपरोक्त सात सेवांसाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता नाही. पोर्टलद्वारेच दस्ताऐवजांसाठीचा अर्ज आणि पैसे भरण्याची सुविधा आहे. सन २००५ पासून पुढे उत्तीर्ण विद्यार्थ्यांना त्यांचा पर्मनंट रजिस्ट्रेशन क्रमांक (पी.आर.एन.) आणि उत्तीर्ण झाल्याचे वर्ष इतक्या माहितीवर ऑनलाईन लॉगीन करता येऊ शकेल. सन २००५ पूर्वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मॅन्युअल फॉर्म भरावा लागणार असून तोही येथे उपलब्ध आहे. या मागील विद्यार्थ्यांच्या माहितीचा समावेश करण्याची प्रक्रियाही प्रगतीपथावर आहे. विद्यार्थ्यांना एकाच लॉगिनमधून सर्व दस्तावेजांकरिता अर्ज करण्याची तसेच, त्या सर्वांसाठी एकत्र ऑनलाइन पैसे भरण्याची सुविधा देण्यात आलेली आहे. सदर प्रणालीमुळे विद्यार्थ्यांच्या वेळेची व पैशाची बचत होणार आहे.

या प्रणालीमध्ये Sukapps.unishivaji.ac.in/sfcapp/#/login या लिंकद्वारे प्रविष्ट होता येते. प्रणाली तयार करण्यासाठी आशिष घाटे, शशिकांत हुक्केरी, विजय पाटील आणि सागर आंबेकर यांचे तांत्रिक सहाय्य लाभले. प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार आहे. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनी रेडेकर यांच्यासह संगणक केंद्रातील सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 AUG 2024 पुण्यनगरी

# विद्यार्थी सुविधा केंद्राच्या सुविधा आता 'ऑनलाईन' उपलब्ध

## शिवाजी विद्यापीठाच्या संगणक केंद्राची महत्त्वपूर्ण कामगिरी

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांना लागणाऱ्या विविध शैक्षणिक दस्ताऐवजांची उपलब्धता करण्यासाठी शिवाजी विद्यापीठाने नवीन ऑनलाईन पोर्टलची निर्मिती केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना आता केवळ तेवढ्यासाठी विद्यार्थी सुविधा केंद्राकडे प्रत्यक्ष भेट देण्याची आवश्यकता उरणार नाही. ही माहिती संगणक केंद्राचे प्रभारी संचालक अभिजित रेडेकर यांनी दिली.

कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या निर्देशानुसार अभिजित रेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाचे संगणक केंद्र



आणि परीक्षा विभागाकडील आयटी कक्ष यांनी संयुक्तपणे काम करून ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. या पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना आवश्यक असणारे पदवी प्रमाणपत्र, तात्पुरते पदवी प्रमाणपत्र, दुबार गुणतक्ता, उत्तीर्णतेचे प्रमाणपत्र, रँक प्रमाणपत्र, गुणवत्ता प्रमाणपत्र आणि विशेष प्रमाणपत्र अशी सात प्रकारची कागदपत्रे उपलब्ध करून देण्याची ऑनलाईन सुविधा विकसित करण्यात आली आहे. आतापर्यंत सदर सेवांसाठी विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रास प्रत्यक्ष भेट देऊन त्यासंबंधीचे अर्ज व पैसे भरावे लागत असत. या ऑनलाईन पोर्टलमुळे उपरोक्त सात सेवांसाठी विद्यार्थ्यांना विद्यापीठात येण्याची आवश्यकता भासणार नाही.

ही प्रणाली तयार करण्यासाठी आशिष घाटे, शशिकांत हुक्केरी, विजय पाटील आणि सागर आंबेकर यांचे तांत्रिक सहाय्य लाभले आहे.

या प्रणालीमुळे विद्यार्थ्यांची मोठी सोय होणार असल्याने संगणक केंद्रातील सर्व सहकारी अभिनंदनास पात्र असल्याची प्रतिक्रिया कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी व्यक्त केली. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव आणि वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी पाटील यांनीही रेडेकर यांच्यासह सर्वांचे अभिनंदन केले.

0 8 AUG 2024

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# महायुद्धाचे विनाशकारी संकट टाळणे आवश्यक

## डॉ. राजन पडवळ; शिवाजी विद्यापीठात व्याख्यान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : 'मानवाच्या कल्याणासाठी जगावरील महायुध्दाचे विनाशकारी संकट टाळणे आवश्यक आहे,' असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया चेअरचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी येथे केले.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि बँक ऑफ इंडिया चेअर व गुरुवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्रातर्फे विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहामध्ये त्यांचे 'हिरोशिमावरील बॉम्बस्फोट



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील व्याख्यानात बोलताना बँक ऑफ इंडिया चेअरचे समन्वयक डॉ. राजन पडवळ.

आणि त्यामागील इतिहास' याविषयावर व्याख्यान दिले. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, तर प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

जपानच्या हिरोशिमावर ६ ऑगस्ट १९४५ रोजी मानवजातीवर पहिला अणुबॉम्ब टाकण्याचा विनाशकारी प्रयोग केला गेला. त्यानंतर तीन दिवसांनी ९ ऑगस्टला दुसरा अणुबॉम्ब नागासाकीवर टाकला आणि युरोपपासून सुरू झालेल्या महायुध्दाचा प्रवास जपानपर्यंत येऊन थांबला. पहिले महायुध्द २८ जुलै १९१४ रोजी सुरू झाले. येथूनच म्हणजे पहिल्या महायुध्दामध्येच दुसऱ्या महायुध्दाची पाळेमुळे रोवली गेली. सव्वाचार वर्षे हे महायुध्द सुरू होते. त्यावेळच्या साम्राज्यशाहीमुळे महायुध्दास सुरुवात झाल्याचे डॉ. पडवळ यांनी सांगितले. त्यांनी पहिल्या, दुसऱ्या महायुद्धाचा आढावा मांडला. पहिल्या आणि दुसऱ्या महायुध्दामध्ये मोठ्या प्रमाणात सैनिकांबरोबरच सामान्य नागरिकांनाही याची झळ बसली. महायुध्दामध्ये बेचिराख झालेल्या जपानने आज फिनिक्स पक्ष्याप्रमाणे नवीन उभारी घेतल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आजीवन व अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 AUG 2024
पुढारी

# जगावरील महायुद्धाचे विनाशकारी संकट टाळणे आवश्यक : डॉ. पडवळ

## शिवाजी विद्यापीठात हिरोशिमा दिनानिमित्त कार्यक्रम

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मानवाच्या कल्याणासाठी जगावरील महायुद्धाचे विनाशकारी संकट टाळणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाच्या बँक ऑफ इंडिया चेअरचे समन्वयक डॉ. राजन पडवळ यांनी केले.

विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग आणि बँक ऑफ इंडिया चेअर व गुरूवर्य लक्ष्मणराव इनामदार सहकार प्रशिक्षण केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू सभागृहामध्ये हिरोशिमा दिनी 'हिरोशिमावरील बॉम्बस्फोट आणि त्यामागील इतिहास' या विषयावरील कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांची उपस्थिती होती. डॉ. पडवळ म्हणाले, जपानच्या हिरोशिमावर ६ ऑगस्ट १९४५ ला मानवजातीवर पहिला अणुबॉम्ब टाकण्याचा विनाशकारी प्रयोग केला गेला. त्यानंतर तीन दिवसांनी ९ ऑगस्टला दुसरा अणुबॉम्ब नागासाकीवर टाकला. युरोपपासून सुरू झालेल्या महायुद्धाचा प्रवास जपानपर्यंत येऊन थांबला.



कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात बोलताना डॉ. पडवळ.

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, पहिल्या व दुसऱ्या महायुद्धामध्ये मोठ्या प्रमाणात सैनिकांबरोबरच सामान्य नागरिकांनाही याची झळ बसली. महायुद्धामध्ये बेचिराख झालेल्या जपानने फिनिक्स पक्षाप्रमाणे नवीन उभारी घेतली आहे.

विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. प्रकाश गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, आजीवन व अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 8 AUG 2024
लोकमत

# आंतरविद्याशाखीय ज्ञान आत्मसात करा : सोनवणे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** विद्यार्थ्यांनी नेट, सेट आणि गेटसारख्या स्पर्धात्मक परीक्षांसाठी परिश्रमपूर्वक तयारी करतानाच आंतरविद्याशाखीय ज्ञान आत्मसात करावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठातील जीवरसायनशास्त्र अधिविभागाचे प्रमुख प्रा. डॉ. के. डी. सोनवणे यांनी केले. एम.एस्सी भाग १ मध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभात ते बोलत होते. अधिविभागप्रमुख प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे अध्यक्षस्थानी होते.

डॉ. सोनकवडे यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व आणि जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या गुणांबद्दल मार्गदर्शन केले. अधिविभागाची परंपरा, अधिविभागातील शिक्षकांचे योगदान, संशोधनातील विभागाचे स्थान या विषयांवर प्रकाश टाकला. श्रुती खराडे आणि नेहा शहा यांनी सूत्रसंचालन केले. सक्षता वाघमारे यांनी परिचय करून दिला. अदिती गुरव यांनी आभार मानले. यावेळी प्रा. डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. एस. पी. दास, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. ए. आर. पाटील, डॉ. एस. एस. पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 AUG 2024
लोकमत

# ध्येय निश्चित केल्यास करिअरच्या संधी

कोल्हापूर : विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना ध्येय निश्चित केल्यास करिअरच्या संधी प्राप्त होतील,असा विश्वास शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य अधिविभागाचे विभागप्रमुख प्रा.डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्रातील बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम.,एम.एस्सी. (गणित), व एम.बी.ए. या अभ्यासक्रमातील शैक्षणिक वर्ष २०२३ -२४ मधील माजी विद्यार्थ्यांच्या मेळाव्यात ते बोलत होते. प्रा. डॉ. डी. के. मोरे अध्यक्षस्थानी होते. उपकुलसचिव व्ही. बी. शिंदे उपस्थित होते. प्रा. डॉ. कृष्णा पाटील यांनी स्वागत केले. सुशांत माने यांनी परिचय करून दिला. डॉ. प्रकाश बेळीकट्टी यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. नितीन रणदिवे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 AUG 2024


लोकमत

# विद्यापीठात मोडी लिपीचा खजिना; अडीच लाख कागदपत्रांचे जतन

पोपट पवार
लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवपूर्वकाळ ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची दैनंदिन कामकाजासाठीची मुख्य लिपी ही मोडीच होती. त्यामुळे या काळातला इतिहास या मोडी लिपीतच दडला आहे. तो अभ्यासायचा असेल तर मोडी लिपीचे ज्ञान अन् या लिपीतील कागदपत्रे गरजेची आहेत. अलीकडच्या काळात ही कागदपत्रे अत्यंत दुर्मीळ होत असताना शिवाजी विद्यापीठातील छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्रात मात्र तब्बल अडीच लाख मोडी लिपीतील कागदपत्रांचा खजिनाच उपलब्ध आहे. ज्याला इतिहासात जाऊन संशोधन करायचे आहे अशांसाठी हा दस्ताऐवज लाखमोलाचा आहे. विशेष म्हणजे या सर्व कागदपत्रांचे डिजिटायझेशन करण्यात आले असून ही लाखमोलाची कागदपत्रे इतिहास संशोधनाला चालना देणारी ठरत आहेत.

शिवपूर्वकाळापासून ते स्वातंत्र्यकाळापर्यंत प्रशासनाची तसेच दैनंदिन कामकाजासाठी मराठी भाषेबरोबरच मोडी लिपी मुख्यलिपी होती. त्यामुळे या काळातील सगळा इतिहास या मोडी लिपीतच उपलब्ध आहे. छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन केंद्राकडे शिर्के दप्तर, नाना फडणवीस दप्तर, भगवानदास घारगे, ढेरगे दप्तर, महाजन दप्तर, पिसाळ दप्तर, नाईक दप्तर, जयरामस्वामी दप्तर, पारसनीस दप्तर व अकोलकर दप्तर या विविध कालखंडाचा इतिहास सांगणारी मोडी लिपीतील अडीच लाख कागदपत्रे उपलब्ध आहेत. याचे सीडीच्या रूपात डिजिटायझेशन केले आहे.



## शंभराहून अधिक जणांनी केला अभ्यास

■ इतिहास अधिविभागाअंतर्गत छत्रपती शाहू महाराज मराठा इतिहास अध्ययन अध्यासन केंद्रात २०२० पासून मोडी लिपीचा अभ्यासक्रम सुरू केला आहे. चार वर्षांत तब्बल शंभराहून अधिक जणांनी हा अभ्यासक्रम पूर्ण केला आहे.

■ सहा महिन्यांचा हा अभ्यासक्रम असून प्रवेशित विद्यार्थ्यांना मोडी लिपीचे तज्ज्ञ मार्गदर्शन करतात. विशेष म्हणजे कुणबी प्रमाणपत्राचा विषय प्रचंड चर्चेत असताना जिल्हा प्रशासनाने कागदपत्रांवरील मोडी लिपी ओळखण्यासाठी येथील विद्यार्थ्यांनी मागणी केली होती.

## मोडी लिपी येणे का गरजेचे

बाराव्या शतकापासून मोडी लिपी प्रचलित आहे. शेतीसंबंधीच्या नोंदी, जन्म-मृत्यू नोंदी, खरेदी पत्रे, न्यायालयीन दावे यासंबंधीची कागदपत्रे ही मोडी लिपीतच आहेत. मात्र, मोडी लिपी येत नसल्याने जुन्या कागदपत्रांवर नेमके काय लिहिले आहे हे कळत नाही. जर लिपी वाचता आली तर गूढ माहिती समोर येऊ शकते.

इतिहास काळातील कोणत्याही विषयावर संशोधन करायचे असेल तर मोडी लिपी अवगत असणे गरजेचे आहे. जुन्या काळातील शेतीसंबंधीच्या नोंदी, जन्म-मृत्यू नोंदी, खरेदी पत्रे, न्यायालयीन दावे यासंबंधीची सर्व कागदपत्रे ही मोडी लिपीतच उपलब्ध आहेत. त्यामुळे मोडी लिपीचे ज्ञान अवगत करण्यासाठी विद्यार्थ्यांनी मोडी लिपीच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यावा.

- डॉ. अवनीश पाटील,
इतिहास अधिविभागप्रमुख, शिवाजी विद्यापीठ.

जनसंपर्क कक्ष

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

08 AUG 2024

सकाळ

# प्राध्यापक भरतीचा प्रस्ताव पुन्हा शासनाकडे

## विद्यापीठाकडून सादर : ७२ जागा; मागासवर्गीय कक्षाकडील प्रक्रिया पूर्ण

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिविभागातील प्राध्यापकांच्या ७२ पदांच्या भरतीचा प्रस्ताव पुन्हा राज्य शासनाकडे सादर केला आहे. शासनाची अंतिम मान्यता मिळाल्यानंतर अर्ज मागविण्याची जाहिरात प्रसिद्ध होणार आहे.

राज्यातील विविध १५ अकृषी विद्यापीठे आणि शासनमान्य अभिमत विद्यापीठांमधील शिक्षक, शिक्षक समकक्ष अशा ६५९ पदांच्या भरतीला शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नोव्हेंबर २०२२ मध्ये मान्यता दिली. त्यानुसार शिवाजी विद्यापीठाला एकूण ७२ पदांच्या भरतीसाठी मान्यता मिळाली. भरतीसाठी मान्यता मिळालेल्या पदांच्या अधिविभागानिहाय बिंदूनामावली (रोस्टर) तयार करून त्याच्या तपासणीचा प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनाने फेब्रुवारीमध्ये शासनाकडे पाठविला. त्याला शासनाकडून मान्यताही मिळाली. त्यानंतर अर्जासह अन्य प्रक्रियेबाबतची जाहिरात प्रसिद्ध करण्यास व्यवस्थापन परिषदेने पाच फेब्रुवारीला मान्यता दिली. त्यानंतर या बिंदूनामावलीमध्ये पुन्हा मराठा, एसईबीसी आदी आरक्षणानुसार बदल करण्यासाठी राज्य शासनाच्या मागासवर्गीय कक्षाकडे या पदांच्या भरतीचा प्रस्ताव विद्यापीठाने सादर केला. या कक्षाच्या संबंधित प्रस्तावावरील कार्यवाही नुकतीच पूर्ण झाली असून, अंतिम मान्यतेचा प्रस्ताव विद्यापीठाने शासनाला सादर केला आहे. दरम्यान, या प्रस्तावाला शासनाकडून अंतिम मान्यता मिळाल्यानंतर जाहिरात प्रसिद्ध करून अर्ज मागविण्याची प्रक्रिया राबविली जाणार असल्याचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

### दृष्टिक्षेपात...

- प्राध्यापकांची मंजूर पदे....... २६२
- रिक्त पदे..................... १३९
- सध्या कार्यरत प्राध्यापक ..... १२३
- भरती होणारी पदे...............७२



### शैक्षणिक कामकाजाला गती मिळणार

■ प्राध्यापकांच्या ७२ पदांची भरती प्रक्रियेचा प्रस्ताव मान्यता अंतिम टप्प्यात आहे. ही मान्यता लवकर मिळण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. शासनाकडून अंतिम मान्यता मिळाल्यानंतर भरती प्रक्रिया पूर्ण होईल. त्याने विद्यापीठातील शैक्षणिक कामकाजाला गती मिळणार असल्याची प्रतिक्रिया व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. स्वागत परुळेकर यांनी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 AUG 2024
सकाळ

# 'प्रेमचंद यांचे साहित्य जीवनाला दिशा देणारे'


कोल्हापूर, ता. ७ : हिंदीचे प्रसिद्ध लेखक मुंशी प्रेमचंद यांनी साहित्याच्या माध्यमातून तत्कालीन समाजाचे वास्तववादी चित्रण केले. जे आजही विश्वस्तरावर समस्त मानव जीवनाला दिशा देण्याचे काम करते, असे प्रतिपादन हिंदी विभागाच्या प्रभारी प्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या हिंदी विभागामध्ये मुंशी प्रेमचंद यांच्या १४४ व्या जयंतीनिमित्त आयोजित व्याख्यानात त्या बोलत होत्या. इंग्रजी विभागाचे डॉ. ए. एम सरवदे, राजश्री बारवेकर, सी. ए. लंगरे, दीपक भादले, सुरेंद्र उपरे, सुषमा चौगले, अनिल मकर, सुवर्णा गावडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

08 AUG 2024 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत डीवायपी इंजिनीअरिंगचे २२ विद्यार्थी



रेवती पाटील




अस्मिता मोरे



भक्तीभावना कोळेकर



मेघा पाटील



अनिकेत चव्हाण

**वार्ताहर**

कळंबा

शिवाजी विद्यापीठाकडून घेण्यात आलेल्या सन २०२३-२४ या उन्हाळी शैक्षणीक परीक्षेमध्ये कोल्हापूरातील साळोखेनगर येथील डॉ. डी. वाय. पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या २२ विद्यार्थ्यांनी गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले. यामध्ये डेटा सायन्स विभागाची रेवती पाटील, सिव्हीलची अस्मिता मोरे, इलेक्ट्रिकलची भक्तीभावना कोळेकर यांनी प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच महाविद्यालयाचे सिव्हिल इंजिनिअरिंगचे ५ विद्यार्थी, कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगचे २ विद्यार्थी, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगचे ५ विद्यार्थी आणि डेटा सायन्सचे १० विद्यार्थी गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळविले आले.

महाविद्यालयाच्या डेटा सायन्सच्या रेवती पाटील (प्रथम), दिशा शिंदे (द्वितीय), मयुरेश भंडारी (तृतीय), पियुष काटकर (चौथा), श्रेयश फणसाळकर (पाचवा), पियुषा साजण (सहावा), राफिआ मुल्ला (सातवा), अपूर्वा देसाई (आठवा), खुशी माने (नववा), स्वरूप पाटील (दहावा) तर सिव्हिल इंजिनिअरिंगच्या अस्मिता मोरे (प्रथम), मेघा पाटील (तृतीय), वैष्णवी गुंजवटे (आठवा), पूजा यादव (नववा) आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंगच्या भक्तीभावना कोळेकर (प्रथम), दिव्या तिबिले (चौथा), संध्या सुतार (सातवा), नम्रता पाटील (नववा), प्रसाद जाधव (दहावा) तसेच कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंगच्या अनिकेत चव्हाण (सहावा), शिवम चौगले (दहावा) यानी गुणवत्ता यादीमध्ये स्थान मिळवले आहे.

08 AUG 2024 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विशाळगडावरील वनस्पतीच्या नवीन प्रजातीला शिवाजी महाराजांचे नाव

## न्यू कॉलेजच्या संशोधक विद्यार्थ्यांनी शोधली नवी प्रजाती

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

न्यू कॉलेजच्या वनस्पतीशास्त्र विभागाच्या अक्षय जंगम, रतन मोरे, डॉ. नीलेश पवार तसेच चांदवड नाशिक येथील डॉ. शरद कांबळे आणि शिवाजी विद्यापीठामधील प्रा. डॉ. एस. आर. यादव यांच्या संघाने विशाळगडावरून शोधलेल्या कंदील पुष्प वर्गातील वनस्पतीच्या नवीन प्रजातीचे सेरोपेजिया शिवरायीना असे नामकरण करून छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त केली आहे. या संदर्भातील शोधनिबंध न्यूझीलंड येथून प्रकाशित होणाऱ्या फायटोटॅक्सा या आंतरराष्ट्रीय नियतकालिकात नुकताच प्रकाशित झाला.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने प्रथमच एका वनस्पतीच्या प्रजातीला संबोधित केले जाणार आहे. याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवरील शास्त्रज्ञाकडून



सेरोपेजिया शिवरायीना

घेतली जाणार आहे. अक्षय जंगम व डॉ. नीलेश पवार गेली सहा वर्षे कोल्हापूर जिल्ह्यातील किल्ल्यावरील वनस्पतींचा अभ्यास करत आहेत. त्याअंतर्गत काम चालू असताना ऑगस्ट २०२३ मध्ये विशाळगडावर कंदीलपुष्प वर्गातील एक वेगळी वनस्पती आढळली. भारतामधील कंदीलपुष्प वर्गाचे तज्ज्ञ असणारे डॉ. शरद कांबळे यांनी या वनस्पतीची सखोल पाहणी केली असता ही नवीन प्रजाती असण्याची शक्यता व्यक्त केली. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातील वनस्पती शास्त्रज्ञ प्रा. एस. आर. यादव यांनी या सेरोपेजिया वर्गाला भारतभर एक वेगळी ओळखं निर्माण करून दिली आहे. त्यांनी आत्तापर्यंत या वर्गातील ६ नवीन प्रजाती शोधून काढल्या आहेत. त्यांनी अंतिम निरीक्षणानंतर ही वनस्पती नवीन प्रजाती म्हणून घोषित होऊ शकते यावर शिक्कामोर्तब केले. त्यासंबंधी शोधनिबंध आतंरराष्ट्रीय नियतकालिकात पाठविण्यात आला. नवीन प्रजातीच्या अधिवासाचा विचार करता गडावर याची संख्या मर्यादित असली तरी आजूबाजूच्या डोंगररांगांमध्ये सुद्धा ही प्रजाती आढळू शकते, अशी शक्यता संशोधकांनी व्यक्त केली. त्यांना न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील, संस्थेचे चेअरमन डॉ. के. जी. पाटील यांचे सहकार्य लाभले.